(E - Certificate)


# Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

www.aarthat.com

Peer - Reviewed Journal, { Bi-Monthly }

ISSN : 2277-8721

SJIF Impact Factor : 6.21


# Certificate of Publication

This is to certify that

Mr./Miss./Prof./Dr. माधवराव नरसिंगराव बिरादार

has contributed a paper as author titled

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भुमिका

which got published in

Volume VIII, Issue IV, Month of July – August 2019.

The Editor in Chief and The editorial Board appreciate the intellectual Contribution of the author.

Mr. Rakesh Ramraje

Chief Editor

EIIRJ ISSN-2277-8721 JULY – AUG 2019 Volume–VIII,Issues– IV

# महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भुमिका

प्रा.डॉ. माधवराव नरसिंगराव बिरादार

*सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,*

*दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर जि. नांदेड*

**प्रस्तावना :**

आधुनिक सहकारी चळवळीची सरुवात भारतातं सनं 1904 च्या भारतीय सहकारी संस्थाचा कायद्याने करण्यात आली. स्वातंत्र्यपुर्व काळात ब्रिटिश सरकारने सहकारी चळवळ वाढविण्यासाठी अनेक कायदेशिर मार्गाचा वापर केला असला तरी त्याचे स्वरुप मर्यादित होते. कारण सहकाराला आर्थिक व सामाजिक विकासाचे साधन म्हणून महत्व दिले गेले नव्हते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र सरकारी धोरणात मुलभुत बदल करण्यात येऊन सहकारांस आर्थिक व सामाजिक विकासाचे एक साधन असे महत्व प्राप्त झाले. इतकेच नव्हेतर भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वाच्या 43 आणि 46 व्या कलमात असे नमुद केले आहे की, ग्रामीण भागात वैयक्तिक किंवा सहकारी प्रयत्नाच्या साहाय्याने कुटीर उद्योगांसाठी शासनाने प्रयत्न करावा आणि त्याचप्रमाणे समाजातिल दुर्बल घटकांच्या विशेषतः अनुसुचित जाती व जमाती वगैरे यांच्या आर्थिक निष्ठांची जोपासना करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा. घटनेच्या या मार्गदर्शक तत्वाच्या पार्श्वभुमिवर विचार करता सहकार हे आर्थिक व सामाजिक विकास साध्य करण्याचे आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे महत्वाचे साधन आहे. सहकार ही समाजातील विशेषतः आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे आर्थिक कल्याण साध्य कराणाली एक तत्वप्रणाली व त्यांच प्रमाणे आर्थिक व्यवहाराचे संघटन करणारी एक पध्दती आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेतल्यास आर्थिक विकास प्रकियेतील सहकाराचे स्थान व महत्व लक्षात येईल. आंतराष्ट्रीय श्रमसंघटनेने देशाच्या आर्थिक विकासात सहकाराचे महत्व पटवून देतांना असे स्पष्ट केले आहे की, विकसनशील देशात सहकारी संस्थाची स्थापना व वाढ म्हणजे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक विकासाबरोबरच मानवी प्रगतीचे एक साधन आहे.

देशातील आर्थिक विकास सहकारी प्रयत्नातून शक्य आहे हे सहकारी चळवळीने सिध्द केले आहे. पंचवार्षिक योजनेत सहकारी चळवळीने केलेल्या भरीव कामगिरीमुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. सरकारने तयार केलेल्या विकासाच्या योजनेत सहकाराला महत्वाचे स्थान दिले. सहकारी संस्था ग्रामीण पातळीपर्यंत असल्याने सहकारी संस्थेमार्फत सरकारी योजना लोकांपर्यंत नेणे, त्यात ग्रामीण लोकांना सहभागी करून घेणे व सहकारी संस्थेमार्फत त्या योजना राबवून लोकांचे हित करणे ही जवाबदारी सहकारी संस्थेने यशस्ववीपणे पार पाडली आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासात सहकारी

क्षेत्राची महत्वपुर्ण भुमिका राहिली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील आर्थिक विकासात सहकारी चळवळीची भुमिका यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :**

1 मे 1960 रोजी आजच्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तत्पुर्वी तत्कालीन मुंबई सरकारने 1925 मध्ये समंत केलेला सहकारी संस्थासाठीचा कायदा अस्तित्वात होता. नवे राज्य नवा कायदा असे सरकारला वाटले व महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा 1960 ची अंमलबजावणे 26 जानेवारी 1962 पासून सुरु केली. त्यानंतर मात्र महाराष्ट्रात सहकारी चळवळीच्या विकासाची घोडदोड सुरु झाली. संपुर्ण देशाला गर्व होईल असे स्थान महाराष्ट्राने सहकारी चळवळीत निर्माण केले. संपुर्ण भारतामध्ये सहकार क्षेत्रांत अग्रेसर असलेले एकमेंव राज्य म्हणजे महाराष्ट्र राज्य होय. ही चळवळ महाराष्टात जेवढी रूजली, वाढली व विकसीत झाली तेवढी ती अन्य राज्यात तुलनेने कमी आहे. महाराष्ट्रात आज 60 पेक्षा अधिक क्षेत्रातील व्यवहार सहकारी तत्वावर चालत आहेत. कृषी, उद्योग, पतपुरवठा, विपणंन, प्रकिया,साठवण,सुतगिरण्या, साखर उद्योग, बॅंका, दुग्धव्यवसाय, वराहपालन, मेंढीपालन, कुकुटपालन, इत्यादी बरेचशे उद्योग सहकार तत्वावर चालत असल्याचे आज दिसुन येते. महाराष्ट्र राज्याची आज जी प्रगती झाली आहे त्यात सहकारी चळवळीची भूमिका अंत्यत महत्वाची राहिली आहे हे नाकारता येत नाही.

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : प्रगतीचे स्वरुप**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरुप व्यापक आहे. राज्यातील विभिन्न प्रकारच्या क्षेत्रात विभिन्न प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. राज्य सरकारच्या सहकार खात्याने त्या विभिन्न प्रकारच्या सहकारी संस्थाचे 1) कृषी पंतसंस्था 2) बिगर कृषी पंतसंस्था 3) पणन संस्था 4) प्रकिया व उत्पादक संस्था 5) समाजसेवी व इतर संस्था अशा पाच मुख्य प्रकारामध्ये वर्गवारी केलेली आहे. 1960 दृ 61 ते 2018.19 या कालावधीत या विभिन्न सहकारी संस्थाच्या प्रगती विषयीची आकडेवारी तत्का कमांक 1 मध्ये दिलेली आहे.

तक्ता : 1) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या प्रगतीचा तुलनात्मक आढावा ( कोटी रु.)

| तपशिल | 1960–61 | 1980–81 | 2000–01 | 2017–18 |
|---|---|---|---|---|
| एकूण सहकारी संस्था | 31,565 | 60747 | 158016 | 198252 |
| सभासद संख्या ( लाखात ) | 42 | 148 | 430 | 517 |
| एकूण खेळते भांडवल | 291 | 5210 | 134440 | 365697 |
| दिलेले स्थुल कर्ज | 270 | 2934 | 72067 | 126300 |
| एकूण येणे कर्ज | 171 | 2311 | 67653 | 148957 |
| एकूण विकी मुल्य | 107 | 2353 | 13339 | 31802 |

आधार – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2018–19

वरिल तक्यातील आकडेवारीचा विचार केला तर सहकारी संस्थाची संख्या, समासद संख्या, खेळते भांडवल, दिलेले कर्ज व एकूण विकी मुल्य यात मोठया प्रमाणत वाढ झालेली दिसून येते. ही सर्व आकडेवारी महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या प्रकतीची दिशा व वेग स्पष्ट करते.

महाराष्ट्राचा आर्थिक विकास :

गेल्या 58 वर्षातील महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाची आकडेवारी तक्ता क.02 मध्ये दर्शविलेली आहे.

तक्ता क. 02 महाराष्ट्राच्या आर्थिक विकांसाचा तुलनात्मक आढावा.

| तपशिल | 1960–61 | 1980–81 | 2000–01 | 2017–18 |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रिय उत्पन्न ( कोटी रु. ) | 2249 | 19377 | 243584 | 2139378 |
| कृषी क्षेत्रांपासूनचे उत्पन्न(कोटी रु.) | 585 | 3756 | 32711 | 232446 |
| उद्योग क्षेत्रापासूनचे उत्पन्न(कोटी रु.) | 553 | 6224 | 64942 | 568704 |
| सेवा क्षेत्रापासूनचे उत्पन्न (कोटी रु.) | 1111 | 9397 | 145931 | 1026885 |
| दरडोई उत्पन्न ( रुपये ) | 576 | 3112 | 28540 | 176102 |
| स्थूल सिंचित क्षेत्र ( 000 हेक्टर ) | 1220 | 2415 | 3852 | उपलब्ध नाही |
| सिंचित क्षेत्राचे एकूण लागवडी खालील क्षेत्राशी असलेले प्रमाण | 6.5 | 12.3 | 17.8 | उपलब्ध नाही |
| वन क्षेत्र ( चौरस कि.मी. ) | 63544 | 64222 | 61935 | 61851 |
| वीजनिर्मिती (दसलक्ष किलो वॅट तास ) | 3268 | 17864 | 61209 | 154214 |
| एकूण विजेचा वापर (दसलक्ष किलो वॅट तास ) | 2720 | 14034 | 47289 | 118566 |
| रेल्वे मार्गाची लांबी ( कि.मी. ) | 5056 | 5233 | 5459 | 6114 |
| एकूण रस्त्याची लांबी ( कि.मी. ) | 39241 | 141131 | 216968 | 204045 |
| प्राथमिक शाळाची संख्या | 34594 | 51045 | 65960 | 106546 |
| साक्षरता प्रमाण ( टक्के ) - | 35.1 | 57.5 | 76.9 | 82.3 |

आधार – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2018–19

आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान :

महाराष्ट्र राज्यात सहकारी चळवळीने महाराष्ट्र राज्याचा आर्थिक व सामाजिक चेहरा बदलण्यास बहुमोल मदत केली आहे. गेल्या 58 वर्षातील सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात दिलेले योगदान खालील दृष्टिकोणातून स्पष्ट करता येते.

1. कृषि विकास – शेतीचा विकास होण्यासाठी व अधिकाधिक शेतमालाचे उत्पादन होण्यासाठी शेतकऱ्यानां सुलभ व स्वस्त व्याजदराने कर्जपुरवठा करणे, बी–बीयाने, खते, किटकनाशके, आवजारे,

जलसिंचन सुविधा इत्यादी उपलब्ध करुन देण्याचे काम सहकारी पतसंस्थाने केले आहे. सहकारी पतसंस्थाचे जाळे ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणंत पसरल्यामुळे शेतकऱ्यांना अवाजवी दराने कर्जाच्या जाळयात अडकवुन ठेवणाऱ्या सावकारांच्या दुष्टचकातून शेतकऱ्यांची सुटका झाली आहे. शेतकऱ्यांना शेतीविकासाठी केल्याजाणाऱ्या एकूण कर्जपुरवठयापैकी 50 टक्के पेक्षा अधिक वाटा सहकारी संस्थाचा आहे. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील शेतकऱ्याच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे.

2. **ग्रामीण औद्योगिकरण –** सहकारी क्षेत्रातील वाढत्या प्रकिया संस्थामुळे ग्रामीण औद्योगिकरणाचा पाया विस्तारला आहे. शेती आधारीत उद्योगाच्या समुहात ग्रामीण क्षेत्रात सहकारी साखर उद्योग हा विकासाचा केंद्रबिदु बनला आहे. हा उद्योग अनेक नविन उद्योग सुरु करण्यास मदत करतो. उदा. अल्कोहल, कागद उद्योग, पशुखाद्य प्रकल्प, खते उत्पादन, रसायन निमिती, बायोगॅस इत्यादींच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागात नवनविन औद्योगिक उपकम स्थापन होण्यास उत्तेजन मिळाले आहे.

3. **पायाभुत सुविधाची निर्मिती –** पुर्वी ग्रामीण भागात पक्के रस्ते, वाहतुक व्यवस्था, बॅका, पोस्ट ऑफिस, विज, आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षणसंस्था, वित्तीयसंस्था, बाजारपेठा वगेरे बाबीची उपलब्धता नव्हती परंतु महाराष्ट्रात 1960–61 नंतर सहकारी संस्थाच्या प्रयत्नांतुन या सर्व सुविधा निर्माण झाल्या आहेत.

4. **रोजगार निर्मिती –** सहकार क्षेत्रात अनेक प्रकारच्या कृषि आधारीत उद्योगाची निर्मिती झाली. इतर ही संस्था निर्माण झाल्या. संस्थाची किंवा उद्योगाची संख्या वाढल्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीत वाढ झाली आहे. जवळजवळ पाच लाख लोकांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला. प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, सहकारी पणन संस्था, सहकारी पतसंस्था व बॅका अशा अनेक प्रकारच्या संस्था निर्माण झाल्यामुळे ग्रामीण भागांतील लोकांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला व त्यामुळे ग्रमीण भागांतील लोकांच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे.

5. **बचत संकलन –** सहकारी पतसंस्थाचे जाळे ग्रामीण भागात पसरल्यामुळे याभागातील लोकांना बचतीची सवय लावण्याचे आणि त्याच्याकडून जास्तीत जास्त ठेवी गोळा करण्याचे काम या संस्था करतांना दिसून येतात. या दृष्टिने कृषि व बिगरकृषि पतपुरवठा सहकारी संस्था, नागरी सहकारी बॅका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकानी ठेवी जमा करण्यात चांगलीच प्रगती केली आहे. थोडक्यात, महाराष्ट्रात सहकारी बॅक व्यवसायाने लोकांना बचतीची सवय लावून आर्थिक विकास करण्यास प्रवृत केले आहे.

6. **ग्राहकांच्या खरेदीशक्तीत वाढ –** ग्राहकांच्या उत्पन्नांची मर्यादा विचारात घेऊन सहकारी संस्था त्यानुसार विविध आर्थिक योजनाची आखणी करीत असते. सुलभ हत्यामध्ये वस्तुचा पुरवठा करणे, विक्रयोतर सेवा वाजवी किंमतीत प्रदान करणे, कमी दराने कर्ज पुरवठा करणे, इत्यादी योजनामुळे ग्राहकांच्या खरेदीशक्तीत वाढ घडुन आली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे.

7. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना मदत – समाजातील ज्या व्यक्ती दुर्बल आहेत. त्यांना स्वतंत्रपणे स्वतःची परिस्थिती बदलणे शक्य होत नाही. अशा लोकांना एकत्रीत आणून त्यांच्यात आर्थिकशक्ती प्राप्त करुन देण्याची महत्वपुर्ण भुमिका सहकारी चळवळीने पार पाडली आहे. त्यामुळे कमी उत्पन्न गटातील जनतेला आपले उत्पन्न वाढविण्याची संधी प्राप्त झाली व समाजाच्या प्रगतीचा वेग वाढला. समाजातील दुर्बल घटकांतील व्यक्ती देखील मानाने जगु लागल्या आहेत.

8. शैक्षणिक विकासात योगदान – महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने शैक्षणिक कार्यावरही भर दिला आहे. सहकारी कारखानदारीने ग्रामीन भागात बालवाडया, शाळा, महाविद्यालय इत्यादी शिक्षणसंस्था सुरु करुन शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षण विषयक सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. खेडयातील मुलांना शिक्षणांची दारे खुली करण्याचे कार्य केवळ शासनावर अंबलबुन न राहता संहकारी साखर कारखाने पुढाकार घेऊन पुर्ण केलेली असल्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने सहकाराची ही भुमिका अंत्यत महत्वपुर्ण आहे.

सारांश –

महाराष्ट्राताातील सहकारी चळवळीने उपरोक्त उल्लेखणीय कार्य करुन ग्रामीण भागातील नागरिकांचा विकास म्हणजेच राष्ट्रिय विकास होय हे सिध्द करुन दाखविले आहे. आज महाराष्ट्रात सहकारी संस्थाच्या संख्यात्मक वाढी बरोबर गुणात्मक वाढही झाली असून त्यांचा महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेस अधिक लाभ झाला आहे. या चळवळीमुळे मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होण्यास मदत झाली. रोजगारांची नविन साधने उपलब्ध झाली. आर्थिक विकासात लोकसहभाग दिला. राजकारणात अनेक नेते दिले. ग्रामीण शिक्षणाची केंद्रे विकसीत करुन राज्याच्या मनुष्यबळ विकासात योगदान दिले. शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्जपुरवठा केला. सावकांराचे प्राबल्य घटले. कृषि उत्पादनात वाढ आणि कृषि उद्योगांचा विकास झाला. साखर कारखानदारी बरोबरच लहान आणि इतर उद्योगांचा विकास झाला. बचतीत वाढ होऊन भांडवल निर्मिती वाढली. दुर्बल घटकांना आर्थिक मदत केल्यामुळे उत्पन्न वितरणातील असंमतोल दुर होऊन समाजातील विषमतेचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली. सहकारी चळवळ आणि शासनाचा जवळचा संबंध असल्यामुळे शासनाच्या विविध योजना उदा. दारिद्रय निर्मुलन, रोजगार हमी योजना, जवाहर योजना, ग्रामोद्योग विकास इत्यादी बाबतच्या योजना कमी उत्पन गटातील व्यक्ती तसेच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती पर्यंत पोहचवीण्यात सहकारी चळवळीची मोलांची मदत झाली. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राद्धारे कृषि आणि कृषि उद्योगांच्या विकासातून लोकांच्या उत्पनात आणि राहणीमानात वाढ करण्याद्धारे त्यांना स्वालंबनाचा मार्ग दाखविला. थोडक्यात गेल्या 58 वर्षात सहकारी चळवळीने महाराष्ट्र राज्याचा आर्थिक आणि सामाजिक चेहरा बदलण्यास बहुमोल मदत केली आहे.

संदर्भ सुची –

1. रायखेलकर ए.आर. / अशोक डांगे, सहाकर तत्व आणि व्यवहार, मेहता पब्लीशनं हॉऊस पुणे (1989)
2. चौगुले व्हि.टी. / पठाण के.जी., सहकाराची मुलतत्वे, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे. ( 1980)
3. मोहन सराफ / रमेश दापके, सहकार, विद्याबुक्स, नागपुर ( 1991)
4. भोसले के.एस./काटे के.बी.,सहकार, फडके प्रकाशन कोल्हापुर (1999)
5. मेधा पाटकर / वैशाली रुईकर, सहकार आणि ग्रामीण विकास, श्रीसाईनाथ प्रकाशन नागपुर (2015)
6. जोशी सी.जे., सहक़ाराचा विकास, फ़डके प्रकाशन कोल्हापुर (2000)
7. माधव बिरादार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्याबुक्स पब्लिशेर्स औरंगाबाद (2018)
8. महाराष्टाची आर्थिक पाहणी 2018 –19, अर्थ व सांख्यिकिय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई